



अर्थसंकल्प २०२३-२४

**रुपया येतो कोठून** (पैशात)




अर्थसंकल्प २०२३-२४

**रुपया जातो कोठे** (पैशात)




# महाराष्ट्र शासन

# अर्थसंकल्प २०२३-२४

# सर्वसाधारण चर्चा


**समर्थन -अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,

मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏०२२-२२००३०६०

✉: samarthanmumbai97@gmail.com /www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री.आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव: **डॉ. आशिष भोसले**

संपादन :**मुक्ता भारती व हिंदप्रभा कर्वे**

विश्लेषण आणि संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७

विशेष सहाय्य :
**निलम काकड, स्नेहा घरत, विलास सुवरे, उमेश सांगळेव राजश्री कदम**

मांडणी व अक्षरजुळणी:
**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी


प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

- ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासनाव्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मकअभ्यास करता यावा म्हणून २०१५-१६पासून२०२१-२२ पर्यंत प्रत्यक्ष खर्च आणि २०२२-२३ सुधारित अंदाज तसेच २०२३-२४चेअर्थसंकल्पीय अंदाज समाविष्ट केले आहेत.
- सदर माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.


विश्लेषण आणि संकलन:रुपेश कीर -९८९२९३९६१७

**मार्गदर्शक-विवेक पंडित**

संस्थापक, समर्थन

# राज्य अर्थसंकल्प २०२३-२४

## दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प:

- सन २०२३-२४चा राज्याचा एकूण अर्थसंकल्प रु. ६ लाख २ हजार ८ कोटी २९ लाखांचा आहे. वर्ष २०२२-२३चा अर्थसंकल्प रु. ५ लाख ४८हजार ४०७ कोटी ५२ लाखांचा होता, म्हणजे मागील वर्षाच्या तुलनेत या अर्थसंकल्पात रु. ५३ हजार ६०० कोटी ७७ लाखांनी वाढ झालेली आहे. अर्थसंकल्पातील ही वाढ (८.९०%) इतकी आहे.
- वित्तमंत्र्यांनी केलेल्या भाषणातील भाग-१ मध्ये सन २०२३-२४च्या एकूण खर्चासाठी रु. ५ लाख ४७ हजार ४५० कोटींची तरतूद केली असल्याचे म्हटले आहे.
- सन २०२२-२३चा अर्थसंकल्प रु.५ लाख ४८ हजार ४०७ कोटी ५२ लाखांचा होता. या वर्षीचे सुधारलेले अंदाज रु.५ लाख ८१हजार २६८ कोटी २६ लाखांचे झालेले असून त्यामध्ये रु.३२ हजार ८६० कोटी ७४ लाखांची (५.६५%) वाढ दिसत आहे.
- सन २०२१-२२चा अर्थसंकल्प रु.४ लाख ८४ हजार ९० कोटी ६७ लाखांचा होता, परंतु प्रत्यक्ष खर्चरु.४ लाख ३४ हजार ८२५ कोटी ४० लाख झाले आहेत. याचा अर्थ अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा प्रत्यक्ष खर्चरु. ४९हजार २६५ कोटी २७ लाखांनी (१०.१८%) कमी झाला आहे.

## राज्य योजना व जिल्हा योजना:

- सन २०२३-२४ची एकूण योजना रु. १ लाख ७२ हजार कोटींची असून वर्ष २०२२-२३ची योजना रु.१ लाख ५० हजार कोटींची होती, म्हणजे या वर्षीच्या योजनेत रु. २२ हजार कोटींनी वाढ झाली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत योजनेचे आकारमान १२.७९% वाढले आहे.
- सन २०२३-२४ची जिल्हा योजना रु. १५ हजार १५० कोटींची होती, तर वर्ष २०२२-२३ मध्ये जिल्हा योजना रु. १३ हजार ३४० कोटींची होती म्हणजे या वर्षी त्यात ११.९५% वाढ झाली आहे.

## अनुसूचित जाती घटक योजना :

- सन २०२३-२४ या वर्षासाठी अनुसूचित जाती घटक योजनेसाठी रु.१३ हजार ८२० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सन २०२२-२३ मध्ये या योजनेसाठी रु. १२ हजार २३० कोटींची तरतूद करण्यात आली होती, याचा अर्थ या वर्षी या योजनेच्या आकारमानात ११.५०% वाढ झाली आहे.
- सन २०२२-२३ मध्ये अनुसूचित जाती घटक योजनेसाठी रु. १२ हजार २३०कोटींची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी १५ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत रु. ४ हजार ५८१ कोटी खर्च झाला आहे. प्रत्यक्ष खर्चाचे हे प्रमाण केवळ ३७.४६% आहे.
- सन २०२१-२२ मध्ये अनुसूचित जाती घटक योजनेसाठी रु. १० हजार ६३५ कोटींचा निधी प्रस्तावित केला असताना प्रत्यक्ष खर्च रु. ८ हजार ८२८ कोटी ४९ लाख इतका झाला आहे. याचाच अर्थ या योजनेच्या निधीतून रु. १ हजार ८०६ कोटी ५१ लाखांची (१६.९९%) कपात झाली.

## आदिवासी घटक योजना :

- सन २०२३-२४ या वर्षासाठी आदिवासी घटक योजनेसाठी रु. १२ हजार ६६५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सन २०२२-२३ मधील आदिवासी घटक योजना रु. ११ हजार १९९ कोटींची होती. याचाच अर्थ सन २०२३-२४च्या योजनेचे आकारमान मागील वर्षाच्या तुलनेत ११.५८% वाढ झाली आहे.
- सन २०२२-२३ मध्ये आदिवासी घटक योजनेसाठी रु. १२ हजार ५६२ कोटींचा निधी प्रस्तावित करण्यात आला होता, त्यापैकी १५ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत रु. ५ हजार ८३२ कोटी ४५ लाखाचा निधी खर्च झाला आहे. खर्चाचे हे प्रमाण केवळ ४६.४२% आहे.
- सन २०२१-२२ मध्ये आदिवासी घटक योजनेसाठी रु. १० हजार ३४५ कोटी ४ लाखांचा निधी प्रस्तावित केला असताना प्रत्यक्ष खर्च रु. ७ हजार ७३४ कोटी ७४ लाख इतका झाला आहे. याचाच अर्थ या योजनेच्या निधीतून रु. २ हजार ६१० कोटी ३० लाखांची (२५.२३%) कपात झाली.

## <u>महसुली व भांडवली जमा व तुटीचा राज्याच्या विकासावर परिणाम</u>:

- सन २०२३-२४ मध्ये महसुली जमा रु. ४ लाख ४९ हजार ५२२ कोटी ६१ लाख इतकी अंदाजित केली असून महसुली खर्चरु. ४ लाख ६५ हजार ६४५ कोटी २ लाख इतका होणार आहे. <u>याचाच अर्थ रु. १६हजार १२२ कोटी ४१ लाख इतक्या खर्चात वाढ होणार आहे. त्यामुळे (३.४६%) महसुली तूट येणार आहे.</u>

- सन २०२३-२४ मध्ये भांडवली जमा रु.९७ हजार ९२७ कोटी ३७ लाख होती, असा अंदाज असून भांडवली खर्च मात्र रु.८१ हजार ८०४ कोटी ९६ लाख होणार आहे. <u>याचाच अर्थ भांडवली खर्चाला रु. १६ हजार १२२ कोटी ४१ लाखांची (१६.४६%) कात्री लावली जाणार आहे.</u>

- सन २०२२-२३च्यासुधारित महसुली जमा रु.४ लाख ३० हजार ९२४ कोटी ५४ लाख झाली असून महसुली खर्च मात्र रु.४ लाख ५० हजार ८८९ कोटी ७५ लाख इतका झाला आहे. <u>याचाच अर्थ महसुली तूट रु. १९ हजार ९६५ कोटी २१ लाखांनी (४.६३%) वाढली आहे.</u>

- सन २०२२-२३ची सुधारितअंदाजानुसार भांडवली जमा रु.९७ हजार ३६० कोटी ९९ लाख होती,तर भांडवली खर्च मात्र रु.७७ हजार ३९५ कोटी ७८ लाख होणार आहे. <u>याचाच अर्थ भांडवली खर्चाला रु. १९ हजार ९६५ कोटी २१ लाखांची (२०.५०%) कात्री लावली जाणार आहे.</u>

- सन २०२१-२२ नुसार प्रत्यक्ष महसुली जमारु.३ लाख ३३ हजार ३११ कोटी ५७ लाख झाली असून महसुली खर्च मात्र रु.३ लाख ४९ हजार ६८५ कोटी ८९ लाख इतका झाला आहे. <u>याचा अर्थ महसुली तूट रु. १६ हजार ३७४ कोटी ३२ लाखांनी (४.९१%)वाढली आहे.</u>

- सन २०२१-२२नुसार प्रत्यक्ष भांडवली जमा रु.७३ हजार ५७ कोटी ५७ लाख होती, असा अंदाज असून भांडवली खर्च मात्र रु.४९ हजार १०६ कोटी ४२ लाख होणार आहे. <u>याचाच अर्थ भांडवली खर्चाला रु. २३ हजार ९५१ कोटी १५ लाखांची (३२.७८%) कात्री लावली जाणार आहे.</u>

## राज्याची राजकोषीय तूट:

- सन २०२३-२४ मध्ये राज्याची राजकोषीय तूट रु. ९५ हजार ५०० कोटी ८० लाखांवर पोहोचली आहे.
- सन २०२२-२३ मध्ये सुधारीत अंदाजानुसार राज्याची राजकोषीय तूट रु. ९४ हजार ९८२ कोटी झाली आहे.
- सन २०२१-२२ मध्ये राज्याची प्रत्यक्ष राजकोषीय तूट रु. ६४ हजार ३०१ कोटी ८६ लाख होती.

## विकास व विकासेतर खर्च:

- सन २०२३-२४चा एकूण अंदाजित खर्चरु.६ लाख २ हजार ८ कोटी ३३ लाख इतका असून त्यापैकी विकास खर्चरु. ३ लाख ८२ हजार ५८३ कोटी ८६ लाख (६३.५५%) इतका आहे. तर विकासेतर खर्चरु. २ लाख १९हजार ४२४ कोटी ४७ लाख (३६.४५%) इतका आहे.
- सन २०२२-२३चा एकूण सुधारित अंदाज खर्चरु.५ लाख ८१ हजार २६८ कोटी २५ लाख इतका असून त्यापैकी विकास खर्चरु. ३ लाख ८६ हजार ३४५ कोटी ९७ लाख (६६.४७%) इतका आहे. तर विकासेतर खर्चरु. १ लाख ९४हजार ९२२ कोटी २८ लाख (३३.५३%) इतका आहे.
- सन २०२१-२२चा प्रत्यक्ष खर्चरु.४ लाख ३४ हजार ८२५ कोटी ३९ लाख इतका असून त्यापैकी विकास खर्चरु. २ लाख ७७ हजार ४६ कोटी ९८ लाख (६३.७१%) इतका आहे. तर विकासेतर खर्चरु. १ लाख १९हजार ४२४ कोटी ४७ लाख (५०.४६%) इतका आहे.

## राज्याला होणारी कर्ज प्राप्ती व एकूण कर्ज:

- राज्य शासनाला वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण कर्ज प्राप्ती रु. ६८ हजार ६७ कोटी ४५ लाखांची होणार आहे.

- सन २०२३-२४ मध्ये राज्यावरील कर्जाचा एकूण भार रु. ७ लाख ७ हजार ४७२ कोटी इतका असून, वर्ष २०२२-२३ मध्ये तो रु.६ लाख ३९ हजार ४२५ कोटी होता. म्हणजे मागील वर्षाच्या तुलनेत एकूण कर्जात रु. ६८ हजार ४७ कोटींनी (९.६२%) वाढ झाली आहे.
- सन २०२३-२४च्या रु.७ लाख ७ हजार ४७२ कोटींच्या एकूण कर्जाच्या रकमेमध्ये वेतन, निवृत्ती वेतन व व्याज यांची एकत्रित रक्कम रु. २ लाख ६२ हजार ८०३ कोटी (३७.१५%) इतकी आहे.
- सन २०२३-२४ मध्ये राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न रु. ३८ लाख ७९७ हजार ९२ कोटी इतके असून त्या तुलनेत राज्यावरील एकूण कर्जाचे (रु. ७ लाख ७हजार ४७२ कोटी) प्रमाण १८.२३% आहे.

## केंद्रीय करातील राज्याचा हिस्सा व केंद्राकडून मिळणारे सहाय्य:

- सन २०२३-२४ मध्ये केंद्रीय करातील राज्याचा हिस्सा रु.६४ हजार ५२४ कोटी ८८ लाख इतका आहे.
- सन २०२३-२४ मध्ये केंद्र शासनाकडून सहाय्यक अनुदानाच्या स्वरुपात राज्याला रु.६२ हजार ६४७ कोटी येणे आहेत.
- राज्य शासनाने विविध विभागांना दिलेल्या हमी पैकी वर्ष २०२१-२२च्या अखेरी पर्यंत येणारी रक्कम रु.५१ हजार २६३ कोटी ३५ लाख इतकी आहे. त्यावरील शुल्क म्हणून राज्याला रु.२ हजार ४७१ कोटी ३८ लाख येणे होते त्यापैकी केवळ रु.२१४ कोटी २८ लाखांची (८.६७%) रक्कम प्राप्त झाली आहे तर रु. २ हजार २५७ कोटी १० लाख (९१.३३%) इतकी रक्कम अप्राप्त आहे.

## सन २०२२-२३-१५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्राकडून मिळणारा निधी:

- केंद्र शासनाकडून सन २०२२-२३ साठी १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाकडून रु. ११ हजार ३७२ कोटी राज्याला मिळणार होते, त्यापैकी आतापर्यंत केवळ रु.

४ हजार ८४७ कोटी ७८ लाख प्राप्त झाले असून आजही रु. ६ हजार ५२४ कोटी २२ लाखांचा (५७.३७%) निधी अप्राप्त आहे.

- १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार आरोग्य क्षेत्रासाठी केंद्र सरकारकडून रु. १ हजार ३३१ कोटी मिळणार होते, मात्र त्यापैकी राज्य सरकारला १ रुपयाही प्राप्त झालेला नाही.

## राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचारी:

- सन २०२१-२२ नुसार राज्यात शासन, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील युनिट यामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या १४ लाख ८७ हजार २४० कोटी इतकी असून त्यांच्यावरील वेतनाचा खर्चरु.१ लाख १३ हजार १८८ कोटी ५१ लाख इतका झाला आहे.

## एकूण महसुली खर्च व राज्यावरील बांधील महसुली खर्चाचा तपशील:

तक्ता क्र. १ (रु. कोटीत)

| वर्ष | वेतन | निवृत्ती वेतन | व्याज प्रदाने | एकूण | एकूण महसुली खर्च | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| २०२२-२३ | १,२८,८७१.०० | ५८,३१०.०० | ४५,८८१.०० | २,३३,०६२.०० | ४,५०,८८९.७५ | ५१.६९ |
| २०२३-२४ | १,४४,७७१.०० | ६७,३८४.०० | ५०,६४८.०० | २,६२,८०३.०० | ४,६५,६४५.०२ | ५६.४४ |

*(**स्त्रोत:** महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण विवरणपत्र व प्रकटीकरण २०२३-२४)*
*(टीप: वर्ष २०२२-२३ सु अं. व २०२३-२४ अ.अं.)*


- वर्ष २०२२-२३ मध्ये एकूण महसुली खर्च रु. ४ लाख ५० हजार ८८९ कोटी ७५ लाख होणार असून त्यामध्ये वेतन निवृत्ती वेतन व व्याज प्रदानाची रक्कम रु. २ लाख ३३ हजार ६२ कोटी इतकी असून त्याचे प्रमाण ५१.६९% आहे.

- वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण महसुली खर्च रु. ४ लाख ६५ हजार ६४५ कोटी ०२ लाख होणार असून त्यामध्ये वेतन निवृत्ती वेतन व व्याज प्रदानाची रक्कम रु. २ लाख ६२ हजार ८०३ कोटी इतकी असून त्याचे प्रमाण ५६.४४% आहे.

*(स्त्रोत: वित्त विषयक विवरण पत्र, संक्षिप्त अर्थसंकल्प, महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, राजकोषीय धोरणाच्या व्युहरचनेचे विवरणपत्र आणि प्रकटीकरण, वर्ष २०२२-२३ व २०२३-२४)*

# राज्य अर्थसंकल्पाचे आकारमान वाढते मात्र प्रत्यक्षात खर्चात घट

आलेख क्र: १ राज्य अर्थसंकल्पाचे वाढते आकारमान




| | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | २४३०२६ | २७०७६३ | ३००३९७ | ३६७२८० | ४०३२०७ | ४३४०८४ | ४८४०९० | ५४८४०७ | ६०२००८ |
| सुधारित अंदाज | २४७३२४ | २८२४५४ | ३२३६५२ | ३७३२३४ | ४१६९२१ | ४३७३९० | ४९६६३७ | ५८१२६८ | |
| प्रत्यक्ष खर्च | २२५२८६ | २५६९४२ | २८६७६८ | ३२८७३२ | ३७८६६६ | ४०१७२४ | ४३४८२५ | | |

*( स्त्रोत : वित्तविषयक विवरणपत्र, टीप : अर्थसंकल्प २०२३-२४, सुधारित अंदाज २०२२-२३, प्रत्यक्ष खर्च२०२१-२२)*

- **सन २०२३-२४चा अर्थसंकल्प रु. ६ लाख २ हजार ८ कोटींचा आहे. आधीच्या वर्षाच्या अर्थसंकल्पाशी म्हणजेच वर्ष २०२२-२३च्या सुधारित अंदाजाशी तुलना करता रु. २० हजार ७४० कोटींनी अधिक आहे.**
- **सन २०१५-१६ ते २०२१-२२ या कालखंडाचा विचार करता वर्ष २०१५-१६ ते वर्ष२०२१-२२ या ६ वर्षाच्या कालावधीत एकाही वर्षी अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारित अंदाजा एवढा खर्च झालेला नाही.**
- **सुधारित अंदाजांपेक्षा प्रत्यक्ष खर्च कमी याचाच अर्थ निधीची उपलब्धता न झाल्याने खर्चाला लावलेली कात्री म्हणावी लागेल.**

# क्षेत्रनिहाय खर्चात रु. २३ हजार ४६६ कोटींची कपात

## ग्रामीण विकासाला खीळ

### (क्षेत्रनिहाय खर्च-वार्षिक कार्यक्रम-२०२१-२२)

तक्ता क्र.२ *(रु. कोटीत)*

| वर्ष २०२१-२२ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अक्र. | क्षेत्र | अपेक्षित खर्च | प्रत्यक्ष खर्च | वाढ/घट (+/-) | प्रमाण (%) |
| १. | कृषि व संलग्न सेवा | ११,११४.३४ | ९,०३०.२० | -२,०८४.१४ | -१८.७५ |
| २. | ग्रामीण विकास | ६,१३६.४० | ४,७३२.०८ | -१,४०४.३२ | -२२.८९ |
| ३. | विशेष क्षेत्र विकास | ३७४.६७ | २२२.५१ | -१५२.१६ | -४०.६१ |
| ४. | पाटबंधारे व पूरनियंत्रण | १४,८९६.२३ | १२,३०९.५८ | -२,५८६.६५ | -१७.३६ |
| ५. | ऊर्जा | १८,१५२.६८ | १३,३०७.१७ | -४,८४५.५१ | -२६.६९ |
| ६. | उद्योग व खाण | ८८६.५५ | ४३९.६६ | -४४६.८९ | -५०.४१ |
| ७. | परिवहन | २४,२६६.४३ | २९,३७८.७६ | ५,११२.३३ | २१.०७ |
| ८. | विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | १९३.९६ | १३६.२१ | -५७.७५ | -२९.७७ |
| ९. | सामान्य आर्थिक सेवा | १,९१४.१९ | १,१६४.२४ | -७४९.९५ | -३९.१८ |
| १०. | सामाजिक व सामूहिक सेवा | ५६,०३९.३९ | ४१,५६८.६४ | -१४,४७०.७५ | -२५.८२ |
| ११. | सामान्य सेवा | ६,१९३.६९ | ५,१६०.७६ | -१,०३२.९३ | -१६.६८ |
| १२. | इतर कार्यक्रम | ४,३३२.८२ | ३,५८४.९२ | -७४७.९० | -१७.२६ |
| | एकूण | १,४४,५०१.३५ | १,२१,०३४.७३ | -२३,४६६.६२ | -१६.२४ |

*(स्रोत :वार्षिक कार्यक्रम, संक्षिप्त विवरण -२०२१-२२ व २०२३-२४, वित्त विभाग)*

- **क्षेत्रनिहाय खर्चाचा आढावा घेता असे दिसून येते की, वर्ष २०२१-२२मध्ये १२ क्षेत्रावरील कार्यक्रमांसाठी रु. १ लाख ४४ हजार ५०१ कोटी ३५ लाखअपेक्षित खर्च होता त्यापैकी, प्रत्यक्ष खर्च केवळ रु. १ लाख २१ हजार ३४ कोटी ७३ लाख करण्यात आला आहे.याचाच अर्थ रु. २३ हजार ४६६ कोटी ६२ लाख (१६.२४%) इतका कमी निधी या क्षेत्रांच्या कार्यक्रमांवर खर्च झाला.**

- **सामाजिक व सामूहिक सेवा खर्च हे दुर्बलांना न्याय देण्यासाठी निधी दिला जातो. या क्षेत्राचा अपेक्षित खर्च रु. ५६ हजार ३९ कोटी ३९ लाख इतका होता, त्यापैकी रु. ४१ हजार ५६८ कोटी ६४ लाख खर्च करण्यत आले. त्यामुळे खर्चात रु. १४ हजार ४७० कोटी ७५ लाखांची (२५.८२%) घट झाली आहे.**

- ऊर्जा क्षेत्रासाठी अपेक्षित खर्च १८ हजार १५२ कोटी ६८ लाख होता. मात्र प्रत्यक्षात रु. १३ हजार ३०७ कोटी १७ लाख इतका खर्च करण्यात आला आहे. याचाच अर्थ रु. ४ हजार ८४५ कोटी ५१ लाख (२६.६९) कमी खर्च झाला आहे.

- पाटबंधारे व पूरनियंत्रण क्षेत्रासाठी अपेक्षित खर्च रु. १४ हजार ८९६ कोटी २३ लाख होता मात्र प्रत्यक्षात रु. १२ हजार ३०९ कोटी ५८ लाख खर्च करण्यात आले.म्हणजेच अपेक्षित खर्चापेक्षा रु. २ हजार ५८६ कोटी ६५ लाखांचा (१७.३६%) कमी निधी दिला गेला.

- कृषि व संलग्न सेवा क्षेत्रासाठी रु. ११ हजार ११४ कोटी ३४ लाखांचा निधी खर्च होणे अपेक्षित होते, मात्र प्रत्यक्षात रु. ९ हजार ३० कोटी २० लाख खर्च करण्यात आले. याचाच अर्थ रु. २ हजार ८४ कोटी १४ लाख (१८.७५%) कमी खर्च झाला.

- ग्रामीण विकास हा राज्याच्या विकासाचा पाया आहे या क्षेत्रासाठी रु. ६ हजार १३६ कोटी ४० लाखांचा खर्च करणे अपेक्षित होते परंतु प्रत्यक्ष खर्च रु. ४ हजार ७३२ कोटी ८ लाख झाला आहे. म्हणजेच रु. १ हजार ४०४ कोटी ३२ लाख इतका कमी निधी खर्च झाला आहे. त्यामुळे या क्षेत्रावरील खर्चात (२२.८९%) ची घट झाली आहे.

- सामान्य सेवा या क्षेत्रासाठीरु. ६ हजार १९३ कोटी ६९ लाखांची तरतूद करण्यात आली होती, परंतु प्रत्यक्ष खर्च रु. ५ हजार १६० कोटी ७६ लाखांचा झाला. खर्चात रु. १ हजार ३२ कोटी ९३ लाखांची (१६.६८%) घट झाली आहे.

**तात्कालीन वित्तमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात वर्ष २०२१-२२ मध्ये रु. १६ हजार ३७४ कोटी ३२ लाखांचे महसुली तूट दाखविली आहे. मात्र जर वरील क्षेत्रांवर रु. २३ हजार ४६६ कोटी ६२ लाख खर्च होणे अपेक्षित होते, हा खर्च झाला असतातर ही तूट वाढून रु. ३९ हजार ८४० कोटी ९४ लाखांवर गेली असती, हे निश्चित.**

# सामाजिक विभागांच्या खर्चात १४ हजार ७३४ कोटींची कपात

## सामाजिक विभागांचा विकास रोखला

तक्ता क्र.३ *(रु. कोटीत)*

| वर्ष २०२१-२२ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अक्र. | विभाग | अपेक्षित खर्च | प्रत्यक्ष खर्च | घट/वाढ (-/+) | % |
| १. | शालेय शिक्षण | ६२,९०१.७३ | ५८,८१२.१८ | -४,०८९.५५ | -६.५० |
| २. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | १६,५३७.०९ | १५,२७७.१० | -१,२५९.९९ | -७.६२ |
| ३. | आदिवासी विकास | १२,७७८.९४ | ८,७२४.९५ | -४,०५३.९९ | -३१.७२ |
| ४. | अन्न व नागरी पुरवठा | १६,१६४.६२ | १२,५३३.६० | -३,६३१.०२ | -२२.४६ |
| ५. | कृषि व पदुम | ११,७१७.१२ | १०,०१६.८६ | -१,७००.२६ | -१४.५१ |
| | एकूण | १,२०,०९९.५० | १,०५,३६४.६९ | -१४,७३४.८१ | -१२.२७ |


*(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज , भाग -२ खर्चाचे विभागवार अर्थसंकल्पीय अंदाज वर्ष २०२१-२२ व २०२३-२४)*

- वर्ष २०२१-२२ मध्ये शालेय शिक्षण, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, कृषि व पदुम तसेच अन्न व नागरी पुरवठा या ५ विभागांच्या खर्चात रु. १४ हजार ७३४ कोटी ८१ लाखांची घट झाली आहे. घटीचे हे प्रमाण १२.२७% इतके मोठे आहे.
- शालेय शिक्षणविभागाच्या खर्चात सर्वात मोठी घट झाली असून ती रु. ४ हजार ८९ कोटी ५५ लाखांची आहे. खर्चातील घट ६.५०% झाली आहे.
- कृषि व पदुम विभाग रु. १ हजार ७०० कोटी २६ लाख. घटीचे प्रमाण १४.५१% आहे.
- सामाजिक न्याय विभाग रु. १ हजार २५९ कोटी ९९लाख. घटीचे प्रमाण ७.६२%आहे.
- आदिवासी विकास विभाग रु. ४ हजार ५३ कोटी ९९ लाख (३१.७२%)घट झाली आहे.
- अन्न व नागरी पुरवठा रु. ३ हजार ६३१ कोटी २ लाख (२२.४६%) घट झाली आहे.

# सामाजिक सेवांवरील खर्चाला कात्री लावून
## शासन आणू पाहतेय राजकोषीय स्थैर्य

दरवर्षी सामाजिक क्षेत्रातील योजनांच्या खर्चाला कात्री लावून सदर उद्दिष्ट साध्य केले जात आहे. त्यातून वंचित, उपेक्षित घटकांचा विकास हा मूळ हेतू साध्य होताना दिसत नाही. अनेक प्रकल्प वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याचे चित्र दिसत आहे. अनुसूचित जाती घटक कार्यक्रम, आदिवासी घटक कार्यक्रमाबाबतची ही स्थिती कायम राहिली तर भविष्यात राज्याच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होईलआणि एकांगी असे शहर केंद्रीत विकास होईल.

आलेख क्र: २ **तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण:**




| | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राजकोषीय तूट | १.४४ | १.७६ | १.०२ | ०.९१ | २.०३ | २.७२ | २.०७ | २.६९ | २.४६ |
| महसुली तूट | ०.२७ | ०.३९ | -०.०९ | -०.४७ | ०.६४ | १.५७ | ०.५३ | ०.५७ | ०.४२ |


*(स्त्रोत:वित्तविषयक विवरण पत्र, टीप : अर्थसंकल्प २०२३-२४)*

- **वर्ष २०१५-१६ मध्ये राजकोषीय तूट १.४४% होती, तर महसुली तूट ०.२७% होती त्यामध्ये वाढ होत वर्ष २०२१-२२मध्ये ही तूट अनुक्रमे २.०७% व ०.५३% वर पोहोचली आहे.**

वेतन, निवृत्ती वेतन, व्याज यासारख्या बांधिल खर्चामध्ये सातत्याने वाढ होत असून त्यामुळे महसुली तूट वाढत आहे. याचाच परिणाम होऊन भांडवली खर्चात आवश्यक त्या प्रमाणात वाढ करता येत नाही, ही चिंतेची बाब झाली आहे. करामध्ये अथवा करेतर महसुलामध्ये वाढ करण्यास असलेल्या मर्यादा विचारात घेता राज्यामुळे गुंतवणुकीस सुयोग्य वातावरण निर्माण करणे, अनुत्पादक खर्चास आळा घालणे, हाती घेतलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे. जेणे करून राज्याच्या आर्थिक वाढीस हातभार लागेल.

# राज्यावरील कर्जरु. ७ लाख ७ हजार ४७२ कोटींवर!

आलेख क्र. ३ राज्यावरील एकूण कर्ज




| | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्यावरील एकूण कर्ज | ३२४२०२ | ३६४८१९ | ४०२४०२ | ४०७१५२ | ४५१११७ | ५१९०८६ | ५७६८६८ | ६३९४२५ | ७०७४७२ |

*(स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प - २०२३-२४ )*

- वर्ष २०२३-२४मध्ये राज्याचे एकूण कर्ज रु. ७ लाख ७ हजार ४७२ कोटी इतके अंदाजित करण्यात आले आहे.या दायित्वामध्ये शासनाने विकासासाठी केलेले अन्य करार अंतर्भूत नाहीत. मान. वित्त मंत्र्यांनी जाहीर केलेले अंदाज लक्षात घेता हा निधी राज्याच्या तिजोरीतून गेला नाही तरी ते दायित्व राज्याच्या जनतेवर अप्रत्यक्ष येणारच आहे.

- सामाजिक क्षेत्रावरील खर्च कमी झाल्याने अनेक सामाजिक योजनांच्या खर्चात रु. २३ हजार ४६६ कोटी ६२लाखांची (१६.२४%) कपात झाली आहे. त्यामुळे राज्याच्या विकासाची गती मंदावली आहे.

*(स्रोत :वार्षिक कार्यक्रम, संक्षिप्त विवरण पत्र- २०२१-२२ व २०२३-२४, वित्त विभाग)*

# राज्यातील प्रत्येक नागरिकावर
# ५६ हजार ८७० रुपयांचे कर्ज!

**राज्याचे एकूण कर्ज, व्याज तसेच स्थूल राज्य उत्पन्न व दरडोई कर्ज**

तक्ता क्र.४ (रु. कोटीत)

| वर्ष | कर्ज | स्थूल राज्य उत्पन्न | कर्जाची स्थूल राज्य उत्पन्नाशी (%) | दरडोई कर्ज (रुपयात) |
|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | ३,२४,२०२ | १९,६६,२२५ | १६.४९ | २८,८४३ |
| २०१६-१७ | ३,६४,८१९ | २१,९८,१८५ | १६.६० | ३२,४५७ |
| २०१७-१८ | ४,०२,४२१ | २३,५२,७८२ | १७.१० | ३५,८०२ |
| २०१८-१९ | ४,०७,१५२ | २५,२८,८५४ | १६.१० | ३६,२२३ |
| २०१९-२० | ४,५१,११७ | २६,५७,३७१ | १६.९८ | ४०१३५ |
| २०२०-२१ | ५,१९,०८६ | २६,२७,५४२ | १९.७६ | ४१,७२७ |
| २०२१-२२ | ५,७६,८६८ | ३१,०८,०२२ | १८.५६ | ४६,३७२ |
| २०२२-२३ (सु.अं.) | ६,३९,४२५ | ३५,२७,०८४ | १८.१३ | ५१,४०० |
| २०२३-२४ (अ.अं.) | ७,०७,४७२ | ३८,७९७,९२ | १८.२३ | ५६,८७० |

*स्त्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०२३-२४ व आर्थिक पाहणी २०२२-२३,टीप :अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२४, सुधारित अंदाज २०२२-२३)*

*(टीप : राज्याची लोकसंख्या, २०१५-१६ ते २०२०-२१ साठी जनगणना २०११नुसार ११.२४ कोटी गृहित धरण्यात आली आहे. तसेच २०२१-२२ पासून २०२३-२४ साठी, मार्च २०२१ची प्रक्षेपित लोकसंख्या १२.४४ कोटी)*

- **राज्य स्थूल उत्पन्नाशी कर्जाचे असलेले प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. वर्ष २०१५-१६ मध्ये जेव्हा युतीचे शासन आले त्यावेळी राज्यावरील एकूण कर्ज रु. ३ लाख २४ हजार २०२ कोटी इतके होते. त्यावेळी राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न रु. १९ लाख ६६ हजार २२५ कोटींचे होते. स्थूल राज्य उत्पन्नाशी राज्याच्या एकूण कर्जाचे प्रमाण (१६.४९%).**

- **जून २०२२ मध्ये शिंदे-फडणवीस शासन आले. वर्ष २०२३-२४ मध्ये राज्याचा व्याजासहित कर्जाचा एकूण भार रु. ७ लाख ७ हजार ४७२ कोटींवर गेला असून, राज्य स्थूल उत्पन्न रु. ३८ लाख ७९७ हजार ९२ कोटी आहे. स्थूल राज्य उत्पन्नाशी राज्यावरील एकूण कर्जाचे प्रमाण (१८.२३%) एवढे झाले आहे.**

- **स्थूल राज्य उत्पन्न त्या तुलनेत राज्यावरील एकूण कर्जयाचा विचार केला तर मागील ९ वर्षात कर्जाचे प्रमाण सन २०१५-१६च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये सरासरी १.७४% वाढले आहे.**

- **राज्यातील प्रत्येक व्यक्तीवर व्याजासहित असलेला कर्जाचा भार हा रु. ५६ हजार ८७० इतका आहे.**

# महाराष्ट्र राज्याची ठळक वैशिष्ट्ये

## राज्याची आर्थिक स्थिती:

- सन २०२१-२२ मध्ये पूर्वामानानुसार राज्य अर्थव्यवस्थेत १२.१ टक्के वाढ तर देशाच्या अर्थव्यवस्थेत ८.९ टक्के वाढ अपेक्षित होती मात्र त्यात चालू वर्षी खालीलप्रमाणे घट झालेली आहे.
- सन २०२२-२३च्या पूर्वमानानुसार राज्य अर्थव्यवस्थेत ६.८ टक्के वाढ तर देशाच्या अर्थव्यवस्थेत ७.०० टक्के वाढ अपेक्षित आहे. *याचाच अर्थ मागील वर्षीच्या तुलनेत राज्य अर्थव्यवस्थेत ५.३ टक्के तर देशाच्या अर्थव्यवस्थेत १.९ टक्के घट दर्शवत आहे.*
- सन २०२१-२२ मध्ये राज्याच्या 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्रात ४.४ टक्के वाढ, 'उद्योग' क्षेत्रात ११.९ टक्के वाढ आणि 'सेवा' क्षेत्रात १३.५ टक्के वाढ अपेक्षित होते. मात्र चालू वर्षाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.
- सन २०२२-२३ मध्ये राज्याच्या 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्रात १०.२ टक्के वाढ, 'उद्योग' क्षेत्रात ६.१ टक्के वाढ आणि 'सेवा' क्षेत्रात ६.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. *याचाच अर्थ मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी 'कृषि वसंलग्नकार्ये' क्षेत्रात ५.८ टक्के वाढ, 'उद्योग' क्षेत्रात ५.८ टक्के घट आणि सेवा क्षेत्रात ७.१ टक्के इतकी घट येणार आहे.*
- महाराष्ट्राचे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न रु. ३५,२७,०८४ कोटी अपेक्षित असून तर चालू किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्न रु. २१,६५,५८८ कोटी अपेक्षित आहे.
- महाराष्ट्राचे दरडोई राज्य उत्पन्न वर्ष २०२१-२२या पायाभूत वर्षात (रु. २,१५,२३३), इतके असून निवडक राज्याच्या यादीत महाराष्ट्र ५व्या क्रमांकावर आहे. तर प्रथम क्रमांकावर कर्नाटक (रु.२,७८,७८६), दुसऱ्या स्थानावर तेलंगणा (रु.२,७५,४४३), तिसऱ्या क्रमांकावर हरियाणा (रु.२,७४,६३५) तर चौथ्या क्रमांकावर तामिळनाडू (रु. २,४१,१३१) ही राज्य आहेत.
- राज्य स्थूल उत्पन्नात महसुली तुटीचे प्रमाण १.० टक्का इतकी असून वित्तीय तुटीचे प्रमाण २.८ टक्के इतके आहे. तर थकीत दायित्त्वाचे प्रमाण १८.७ टक्के इतके आहे.

- राज्यावरील दरडोई कर्ज २ लाख ५३ हजार ७९८ कोटी इतके मोठे आहे.
- राज्याचा एकूण खर्चातील विकासात्मक वाटा ६१.२ टक्के इतका असून विकासेतर खर्चाचे प्रमाण ३८.९४ टक्के इतके आहे.

लोकसंख्या:

- राष्ट्रीय लोकसंख्या आयोग, केंद्र शासन यांनी प्रकाशित केलेल्या प्रक्षेपित लोकसंख्येनुसार राज्याची दि. १ मार्च, २०२१ रोजीची लोकसंख्या १२.४४ कोटी इतकी आहे.
- जनगणना २०११च्या जनगणनेनुसार अखिल भारतीय स्तरावर ६.५५ कोटी लोकसंख्या झोपडपट्टीत राहत असून त्यापैकी १.१८ कोटी लोकसंख्या, म्हणजे झोपडपट्टीत राहणाऱ्या एकूण लोकसंख्येपैकी १८ टक्के लोकसंख्या ही महाराष्ट्रातील आहे.

स्त्री-पुरुष व मुला-मुलींचे प्रमाण:

- महाराष्ट्र राज्यातील स्त्री-पुरुष व बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण अनुक्रमे ९२९ व ८९४ इतके असून निवडक राज्याच्या यादीत आपले राज्य अनुक्रमे ७व्या व ८व्या स्थानावर आहे. केरळ राज्य सर्वाधिक १,०८४ व ९६४, दुसऱ्या क्रमांकावर आंध्रप्रदेश ९९७ व ९४४, तर तिसऱ्या क्रमांकावर तामिळनाडू ९९६ व ९४३ इतकी जास्त आहे.
- मुंबई मधील स्त्री-पुरुष प्रमाण ८३२, मुंबई उपनगर ८६० तर ठाणे ८८६ इतके कमी आहे.

सामाजिक क्षेत्र:

१) प्राथमिक शिक्षण:

- वर्ष २०१९-२० मध्ये प्राथमिक शिक्षण देणाऱ्या १ लाख ६ हजार ४९१ शाळा कार्यरत होत्या त्यापैकी २०२१-२२ पर्यंत ६४३ शाळा बंद झाल्या आहेत.
- वर्ष २०१९-२० मध्ये सर्व शाळांमधून १ कोटी ५६ लाख ९० हजार विद्यार्थी शिक्षण घेत होते. वर्ष २०२१-२२ मध्ये या विद्यार्थ्यांच्या संख्येत २ लाख ७० हजारांनी घट झाली आहे.
- वर्ष २०२१-२२च्या आकडेवारीनुसार १ लाख ५ हजार ८४८ शाळांपैकी ३ हजार ९१६ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालये नाहीत.

- राज्याचा एकूण साक्षरता दर ८२.३४ टक्के इतका असून स्त्रियांमधील साक्षरता दर ७५.८७ टक्के इतका आहे.
- इयत्ता ९वी ते १०वी मधील १०.८१ टक्के मुलांची तर १०.६१ टक्के मुलींची गळती होते.

२) <u>माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण</u>:

- माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या वर्ष २०१९-२० मध्ये २८ हजार ९३ इतकी होती त्यामध्ये वर्ष २०२१-२२ पर्यंत ५१९ने वाढ झाली असून ही संख्या २८ हजार ६१२ इतकी झाली आहे.

३) <u>महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची इयत्तानिहाय अध्ययन क्षमता</u>:

- इयत्ता तिसरीतील भाषा २२ टक्के, गणित १७ टक्के तर परिसर विज्ञान १५ टक्के विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेचा स्तर मूलभूत पेक्षाही कमी.
- इयत्ता पाचवीतील भाषा १७ टक्के, गणित ३० टक्के तर परिसर विज्ञान २९ टक्के विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेचा स्तर मूलभूत पेक्षाही कमी.
- इयत्ता आठवीतील भाषा १६ टक्के, गणित २७ टक्के, विज्ञान ३८ टक्के तर सामाजिक शास्त्र ३५ टक्के विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेचा स्तर मूलभूत पेक्षाही कमी.
- इयत्ता १०वी तील आधुनिक भारतीय भाषा ४६ टक्के, इंग्रजी ४१टक्के, गणित ३३ टक्के, विज्ञान ७७ टक्के तर सामाजिक शास्त्र ५८ टक्के विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेचा स्तर मूलभूत पेक्षाही कमी.

४) <u>विद्यापीठ</u>:

- वर्ष २०१९-२० मध्ये राज्यात ६५ विद्यापीठे होती त्यात वर्ष २०२०-२१ मध्ये ६ ने वाढ झाली असून विद्यापीठांची एकून संख्या ७१ झाली आहे.
- वर्ष २०१९-२०मध्ये ४ हजार ४९४ महाविद्यालये होती, त्यामध्ये वर्ष २०२०-२१ मध्ये ३८ने वाढ झाली असून राज्यातील महाविद्यालयाची संख्या ४ हजार ५३२ झाली आहे.

## महिलांवरील अत्याचार:

- वर्ष २०२० मध्ये महिलांवरील अत्याचाराचे ३१ हजार ९५४ गुन्ह्यांची नोंद झाली होती त्यात वर्ष २०२१ मध्ये वाढ झाली असून ही संख्या ३९ हजार ५२६वर पोहोचली तर वर्ष २०२२ मध्ये ऑक्टोबरपर्यंत महिला अत्याचाराच्या गुन्ह्यांची नोंदणी ३६ हजार १८ इतकी झाली आहे.
- बलात्कार, अपहरण व पळवून नेणे, पती व नातेवाईकांकडून अत्याचार, विनयभंग, लैंगिक अत्याचार यासारख्या गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे.

## बालकांवरील अत्याचार:

- वर्ष २०२० मध्ये बालकांवरील अत्याचाराचे १४ हजार ३७१ गुन्ह्यांची नोंद झाली होती. त्यात वर्ष २०२१ मध्ये वाढ झाली असून ही संख्या १७ हजार २३२वर पोहोचली तर वर्ष २०२२ मध्ये ऑक्टोबर पर्यंत बालकांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांची नोंदणी १६ हजार ८३६ इतकी झाली आहे.
- बालकांवरील बलात्कार व अपहरण व पळवून नेणे, यासारख्या गुन्ह्यांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे.

## दारिद्र्य:

- महाराष्ट्रातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या १७.४ टक्के इतकी असून शहरी भागात ९.१ टक्के तर ग्रामीण भागात ती २४.२ टक्के इतकी मोठी आहे.
- राज्यातील १२.४ टक्के लोकांची पोषणमान चिंताजनक असून ७.१ टक्के मातांचे आरोग्य धोक्यात आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना:

- वर्ष जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०२२ पर्यंत गेल्या ७ वर्षात एकूण १४ लाख १६ हजार ३०९ घरकुलांना मंजुरी देण्यात आली मात्र प्रत्यक्षात त्यापैकी ९ लाख २७ हजार ५०४ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले याचा अर्थ मंजुरी मिळालेल्या ४ लाख ८८ हजार ८०५ कुटुंबे आजही घराच्या प्रतीक्षेत आहेत.

## रमाई आवास योजना:

- रमाई आवास योजनेंतर्गत वर्ष २०२२-२३ मध्ये एकाही घराला मंजुरी देण्यात आलेली नाही.

## शबरी आदिवासी घरकुल योजना:

- वर्ष २२-२३ मध्ये शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत २४ हजार ७५ घरे बांधण्याचे लक्ष निश्चित केले होते त्यापैकी केवळ ९४३ घरांना मंजुरी मिळाली आहे.

## अनुसूचित जाती घटक कार्यक्रम:

- अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत वर्ष २०२१-२२ मध्ये रु. १० हजार ६३५ कोटींचा निधी प्रस्तावित करण्यात आला होता त्यापैकी रु. ८ हजार ८२८ कोटी ४९ लाखांचा निधी खर्च झाला याचा अर्थरु. १ हजार ८०६ कोटी ५१ लाखांचा निधी अखर्चित राहिला. निधी अखर्चित राहण्याचे प्रमाण १७ टक्के इतके मोठे होते.
- वर्ष २०२२-२३ मध्ये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत रु. १२ हजार २३० कोटी प्रस्तावित करण्यात आले होते त्यापैकी १५ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत रु. ४ हजार ५८१ कोटी खर्च झाले असून रु. ७ हजार ६४९ कोटी खर्च होणे बाकी होते. खर्च न झालेल्या निधीचे हे प्रमाण ६२.५४ टक्के इतके मोठे आहे.

## आदिवासी घटक कार्यक्रम:

- आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत वर्ष २०२१-२२ मध्ये रु. १० हजार ३४५ कोटींचा निधी प्रस्तावित करण्यात आला होता त्यापैकी रु. ७ हजार ७३४ कोटी ७४ लाखांचा निधी खर्च झाला याचा अर्थरु. २ हजार ६१० कोटी २६ लाखांचा निधी अखर्चित राहिला. निधी अखर्चित राहण्याचे प्रमाण २५.२३ टक्के इतके मोठे होते.
- वर्ष २०२२-२३ मध्ये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत रु. १२ हजार ५६२ कोटी ८९ लाख प्रस्तावित करण्यात आले होते त्यापैकी १५ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत रु. ५ हजार ८३२ कोटी ४५ लाख खर्च झाले असून रु. ६ हजार ७३० कोटी ४४ लाख खर्च होणे बाकी होते. खर्च न झालेल्या निधीचे हे प्रमाण ५३.५७ टक्के इतके मोठे आहे.

**मूलभूत सोयी-सुविधाची स्थिती:**

- राज्यातील १६.६ टक्के कुटुंबांना पिण्यायोग्य स्वच्छ पाण्याची सुविधा उपलब्ध नाही.
- शहरात राहणाऱ्या एकूण लोकसंख्येपैकी २३.३२ टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत राहते.
- राज्यातील महिलांचा कार्य सहभाग दर ३१.०६ टक्के इतका राहिला आहे.
- नागरी भागात बेरोजगारीचा दर ६.५ टक्के इतका मोठा असून ग्रामीण भागात तो २.२ टक्के इतका आहे.

**राज्यातील सिंचन:**

- राज्यातील सिंचनाखालील निश्चित क्षेत्र किती याबद्दल वर्ष २०१०-११ पासून वर्ष २०२१-२२ पर्यंत माहितीच उपलब्ध नाही.

*(स्त्रोत:आर्थिक पाहणी, २०२२-२३ व संक्षिप्त अर्थसंकल्प २०२३-२४)*


## राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांची २ लाख ४४ पदे रिक्त !

दि. २२ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या प्राप्त माहितीनुसार राज्यात सर्व विभाग व जिल्हा परिषदा मिळून शासकीय कर्मचाऱ्यांची १० लाख ७० हजार ८४० पदे मंजूर असून त्यापैकी ८ लाख २६ हजार ४३५ पदे भरली गेली आहेत तर २ लाख ४४ हजार ४०५ पदे रिक्त आहेत.

# नंदुरबार, मुंबई या जिल्ह्यांमधील आर्थिक दरी वाढली !

## राज्याच्या दरडोई जिल्हा उत्पन्नाबाबत राज्याचा असमतोल विकास

आलेख क्र. ४




*(स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वर्ष २०२२-२३)*

- **सर्वात कमी दरडोई उत्पन्न असलेले तीन जिल्हे नंदुरबार (रु.१,०५,८१३), गडचिरोली (रु.१,०८,८१७), वाशिम (रु.१,१७,६९२),असून पुणे (रु. २,८५,४०९), ठाणे (रु. २,९४,३६२) व मुंबईचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक रुपये ३ लाख ४४ हजार ३९४ इतके आहे.**
- **मुंबई, ठाणे व पुणे यासारख्या महानगरांचे दरडोई उत्पन्न आणि ग्रामीण दुर्गम जिल्ह्यांचे उत्पन्न हे विषमतेची प्रचंड दरी दाखविते.**

# अर्थसंकल्प २०२३-२४
# विभागवार अंदाजित खर्च

तक्ता क्र. ५ (रु. कोटीत)

| अक्र. | विभाग | अर्थसंकल्पीय अंदाज -२०२३-२४ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन | ३,९९३.०० | ०.६४ |
| २ | गृह विभाग | ३५,४९९.८३ | ५.७२ |
| ३ | महसूल व वने | २१,७५०.६८ | ३.५० |
| ४ | कृषि व पदुम | १३,६२२.१५ | २.१९ |
| ५ | शालेय व क्रीडा | ७३,६६६.०४ | ११.८७ |
| ६ | नगर विकास | ५२,४४९.७४ | ८.४५ |
| ७ | वित्त | १,६०,३५२.५६ | २५.८३ |
| ८ | सार्वजनिक बांधकाम | ३२,१२०.७१ | ५.१७ |
| ९ | जलसंपदा | २१,७४६.९९ | ३.५० |
| १० | विधी व न्याय | ४,१६७.८० | ०.६७ |
| ११ | उद्योग, ऊर्जा व कामगार | १७,६१८.६८ | २.८४ |
| १२ | ग्राम विकास | २९,२४१.२६ | ४.७१ |
| १३ | अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | १५,०९५.९० | २.४३ |
| १४ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | २१,०९१.२१ | ३.४० |
| १५ | नियोजन | २८,८७०.२८ | ४.६५ |
| १६ | संसदीय कार्य | ४.४५ | ०.०० |
| १७ | गृह निर्माण | ३,००४.२९ | ०.४८ |
| १८ | सार्वजनिक आरोग्य | १४,७२६.८७ | २.३७ |
| १९ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | ६,४९७.३१ | १.०५ |
| २० | आदिवासी विकास | १७,३३२.८७ | २.७९ |
| २१ | पर्यावरण व वातावरणीय बदल | ४४७.२६ | ०.०७ |
| २२ | सहकार,पणन व वस्त्रोद्योग | २,५७१.९७ | ०.४१ |
| २३ | उच्च व तंत्र शिक्षण | १३,६४८.३४ | २.२० |
| २४ | महिला व बाल विकास | ४,७६४.७९ | ०.७७ |
| २५ | पाणी पुरवठा व स्वच्छता | ७,८६९.८९ | १.२७ |
| २६ | कौशल्य, उद्योजकता व नाविण्य | ३१६८.७७ | ०.५१ |
| २७ | महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय | ८५३.०१ | ०.१४ |
| २८ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य | ३,१७७.८० | ०.५१ |
| २९ | अल्पसंख्यांक | ८७७.८२ | ०.१४ |
| ३० | मराठी भाषा | ९२.७१ | ०.०१ |
| ३१ | इतर मागास व बहुजन कल्याण | ४,३४८.६५ | ०.७० |
| ३२ | मृदा व जलसंधारण | ४,७०९.०७ | ०.७६ |
| ३३ | दिव्यांग कल्याण | १,४६४.२३ | ०.२५ |
| | **एकूण** | **६,२०,८४६.९३** | **१००.००** |

*(स्त्रोत : विभागवार खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज - वर्ष २०२३-२४)*